# बाजीराव पेशवे



## पुण्यतिथी २८ एप्रिल

श्री
SHIVDEKAR




थोरले बाजीराव पेशवे म्हणजे मूर्तीमंत शौर्य. शिवाजी महाराजांच्या खालोखालचा वीरपुरुष. संभाजी महाराजांच्या पश्चात मराठे मोगलांशी एकएकटे लढत होते . संभाजीपुत्र शाहूमहारा–जांनी बाळाजी विश्वनाथंना पेशवेपद दिले आणि त्यांनी मातब्बर मराठा सरदारांना एकत्र आणले. चौथ सरदेशमुखी ,स्वराज्याचे शाहू महाराजांच्या नावे फर्मान ,इ. मागण्या पदरात पाडून येसूबाईंची मोगलांच्या तावडीतून

श्री
SHIVDEKAR

सुटका केली. बाळाजींच्या मृत्यूनंतर शाहूंनी बाळाजींच्या अवघ्या १९ वर्षाच्या मुलास , बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिली आणि शाहू महाराजांची निवड अचूक ठरली.

बाजीरावाने स्वराज्यासाठी घोड्यावर मांड ठोकली आणि बाजीरावाचा घोडा मुलुखगिरी साठी चौखूर उधळला तो बालाघाट ,खानदेश , माळवा ,गुजराथ आणि कान्होजी आंगऱ्यांच्या मदतीने अलिबागेत चौथ वसुली साठी. चित्र– दुर्ग ,कर्नाटकची मोहीम यशस्वी पार पाडली .




निजाम उल मुल्क हा मोगलशाहितील युध्द आणि राजकारण यांतील अव्वल दर्जाचा मातब्बर सेनानी होता. दक्षिणेतील सहा सुभ्यांचा सुभेदार होता. त्याच्याकडे अमाप संपत्ती होती. प्रचंड फौज होती. उत्कृष्ट तोफखाना होता. हा बाजीरावापेक्षा ३० वर्षांनी मोठा होता. निजाम मराठ्यांचा प्रतिस्पर्धी होता. तो मराठ्यांच्या चौथाई आणि सरदेशमुखी वसुलीच्या कामात अडथळे आणीत होता. मराठेशाहीतील चंद्रसेन जाधव ,सुलतानजी आणि रंभाजी निंबळकर , उदाजी चव्हाण, कान्होजी भोसले या सरदारांना निजामाने फितवून आपल्या गोटात सामावून घेतले होते. निजामास धडा शिकवून स्वराज्य सुरक्षित करायचे बाजीरावाने ठरविले. बाजीरावास छ.शाहू महाराजांचा पूर्ण पाठिंबा होताच.

निजामाने ऐबतखानास पुणे प्रांतात लुटालूट करायला पाठविले. बाजीरावास याचा सुगावा लागताच त्याने निजामाच्या राज्यातील सिंदखेड ,जालना ही ठाणी लुटली. बाजीराव , निजाम आणि मोगलांच्या राज्यात धुमाकूळ घालू लागला. तेव्हा निजाम आपल्या राज्या-तून बाजीरावास हुसकावण्यासाठी त्याच्या मागावर गेला. बाजीरावाचे सैन्य घोड्यावरचे होते तर निजामाबरोबर तोफखाना व मोठा फौज फाटा होता. बाजीरावाने एखादे ठाणे लुटल्याचे कळताच निजाम त्याच्यावर चालून जायचा पण तो तेथे पोहोचायच्या आधीच बाजीराव दुसऱ्या ठिकाणी धडकायचा असा हा पाठशिवणीचा खेळ चालला होता. वऱ्हाड , बुऱ्हाणपूर ,माहूर ,वाशिम ,खानदेश करत बाजीराव गुजरातेत घुसला. निजामाची फौज

पाठीवर घेऊन त्याला झुकांड्यादेत त्याची दमछाक केली. मग निजाम बाजीरावाचा पाठलाग सोडून पुण्यावर चालून गेला ,त्याला वाटले आपण पुण्यावर चालून गेलो तर बाजीराव शरण येईल. पण झाले भलतेच. बाजीराव आपल्या पुण्याकडे यायच्या ऐवजी त्याने आपला मोर्चा निजामाच्याच राजधानीवर वळवला ,औरंगाबादवर चालून गेला. आता निजाम हादरला त्वरेने आपले राज्य वाचवाय-ला निघाला. भारी फौजफाटा व तोफखाना नेणे म्हणजे वेळखाऊ म्हणून निजामाने आपला तोफखाना अहमदनगर येथेच ठेवायचा निर्णय घेतला आणि येथेच त्याने आपली अर्धी ताकद गमावली.


बाजीरावाचा पाठलाग करीत निजाम औरंगा बादच्या अलिकडे पालखेड यथे पोहोचला




आणि बाजीरावाने रचलेल्या सापळ्यात अडकला. निजामाच्या सैन्याला चारही बाजूंनी मराठ्यांच्या सैन्याने घेरले होते. रसद मिळू शकत नव्हती एवढेच नव्हे तर त्या भागात प्यायला पाणी सुध्दा नव्हते. निजामाच्या सैन्याचा धीर सुटला. युध्द न करताच बलाढ्य निजाम बाजीरावास शरण आला. तह केला. ( सन १७२८ ).जगातील सर्व सैनिकी विद्याल-यात पालखेडची लढाई Strategic war चे एक उत्तम उदाहरण म्हणून शिकवले जाते.



बाजीरावाचा हा तह म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील एक मानचा तुरा. या विजया नंतर शाहू दरबारी बाजीरावाची प्रतिष्ठा उंचावली आणि या युयुत्सू पेशव्याच्या आक्रमक पवित्र्यास सुरवात झाली. सोबत होता पाठचा भाऊ चिमजी अप्पा आणि जिवाला जीव देणारी मित्रमंडळी राणोजी शिंदे ,मल्हारराव होळकर , उदाजी पवार ,नारोशंकर ,बाजी भीवराव ,इ.



उत्तरेच्या मोहिमेवर जाताना नर्मदा नदी रावेर येथे ओलांडीत असत.



मोहिमेवर असता रावेर येथील या वाड्यात बाजीराव विश्रांतीसाठी थांबत .


वाडा.



दक्षिणेत प्रभुत्व निर्माण करुन बाजीराव स्वतः छत्रसाल राजाच्या मदतीला बुंदेलखंडाकडे मोर्चा वळवला. त्याच सुमारास माळव्यातील उदकीर्ण मंडलोई यांनी मोगल सुभेदाराच्या जाचापासून वाचविण्याची विनंती केली. त्या मोहीमेसाठी येणारा खर्च देण्याचे कबूल केले. बाजीराव बुंदेलखंडाच्या मोहीमेवर असल्याने चिमाजी अप्पाला माळव्याच्या मोहीमेवर पाठविले.




येथे चिमाजीच्या नेतृत्वातील मराठी सैन्याने मोगल सैन्याचा पराभव केला आणि माळवा स्वराज्याला जोडला. कबूल केल्याप्रमाणे माळवा मोहीमेचा खर्च लवकर देण्यासाठी इंदूरच्या मंडलोइंना पाठविलेले बाजीरावाच्या शिक्क्याचे हे पत्र.





**बाजीराव पेशवे यांचा शिक्का**

श्री राजा शाहु नरपति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ मुख्यप्रधान



थोरले बाजीराव /
पहिले बाजीराव

जन्म :
भाद्रपद शु.१५
शके १६२२
१८ ऑगस्ट १७००

पेशवाईची वस्त्रे :
१७ एप्रिल १७२०.

बुंदेलखंडात बाजीरावाने बंकशाचा पराभव करुन छत्रसालास संकटमुक्त केले. याच छत्रसालाने मुसलमान स्त्री पासून झालेली आपली मुलगी ' मस्तानी ' बाजीरावास दिली , शिवाय त्याला आपला तिसरा मुलगा मानले.



निजाम आपला पराभव विसरला नव्हता. शाही फौजेसह आपली फौज घेऊन तो बाजीरावावर चालून गेला.



मध्यप्रदेशात भोपाळ येथे मोठे युध्द झाले पण तेथेही निजामाचा पराभवच झाला.

गुजरातचा सुलतान बहादुरशहा याने सोपाऱ्याच्या हिंदू राजाने बांधलेला वसईचा किल्ला पोर्तुगीजांना सन १५३४ मध्ये देऊन टाकला.ख्रिश्चन धर्माचा प्रचार करताना पुढे गोव्यात इंक्वीझिशन ची स्थापना झाली आणि

पोर्तुगीजांनी हिंदूंच्या अनन्वीत छळ करायला , कत्तल करायल सुरवात केली. १५६७ साली एका दिवसात २८० हिंदू मंदिरे पाडली होती. हिंदूंना कोणी त्राता नव्हता. पुढे बाजीराव , पेशवे झाल्यावर त्याच्याकडे वसईतील हिंदूंच्या तक्रारी येऊ लागल्या.मग बाजीरावाने चिमाजीअप्पाला वसईच्या मोहिमेवर पाठविले. वसईच्या किल्ल्याला वेढा घातला. हा वेढा दोन वर्षे दीड महिना चालला होता. तुफान युध्द झाले १७३९ मध्ये चिमाजी अप्पाने २०० वर्षे पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेला वसईचा किल्ला जिंकला. पोर्तुगीजांनी शरणागती पत्करली. पुढे गोवा ,वसई ,ठाणे,केळवेमाहीम इ. ठिकाणी पोर्तुगीजांना रोखले. गोव्यातील व वसई परिसरातील हिंदूंना संरक्षण मिळवून दिले.




बाजीरावाने आपले मुख्य ठाणे पुणे येथे करायचे ठरवले आणि सन १७३० मध्ये शनिवार पेठेत भुईकोट किल्ल्यासारख वाडा बांधायला सुरवात केली आणि १७३२ मध्ये शनिवार वाड्याची वास्तूशांती झाली. पुढे वाड्याच्या आतील वास्तूंत भर पडत गेली.



बाजीरावाने मराठेशाहीची बुध्दी शक्तीने पूजा केली. राजद्रोही लोकांचे दमन केले. मराठी मातीतून नवीन तेजस्वी सरदारांची पिढी तयार केली. स्वराज्याची घोडदौड मोगली मुलखात नेली. भीमथडीची तट्टे व शिलेदार निश्चिंतपणे गंगेत स्नान करु लागले. हिंदुस्तानचे राजकारण शनिवार वाड्यातून चालू लागले.

# पेशवे कालीन भारत



चपळ हालचाली करणे आणि शत्रूला कोंडीत पकडणे हे बाजीरावाचे युध्दतंत्र होते.

बाजीरावाने उत्तरेकडील मुलुख शिंदे, होळकर, जाधव, गायकवाड आणि पवार इ. सरदारांकडे सोपवून जंजिऱ्याकडे मोर्चा वळविला आणि सिद्यास जरब बसविली. इ.स. १७३५ मध्ये बाजीरावाने आपला मोर्चा दिल्लीकडे वळवला. सन १७३६ मध्ये निवडक फौजेसह उदेपूरजवळ पोहोचला. ही बातमी दिल्लीला कळताच बादशहाकडून यादगरखान नजराणा घेऊन भेटीस आला मग काही मागण्या पदरात पाडल्यावर फार ताणून न घेत माघारी फिरला . तो पुन्हा सन १९३७ च्या मार्च मध्ये दिल्लीजवळ पोहोचला व सादतखानाचे गर्वहरण करुन परंतू दिल्लीची लूट न करता धूर्तपणे परतला.

सन १७३९ ,इराणचा नादिरशहा दिल्लीवर चालून आला तेव्हा बादशहाने बाजीरावास मदतीसाठी बोलावणे धाडले, त्या प्रमाणे बाजी–रावाने दिल्लीस प्रयाण केले परंतू बाजीराव तेथे पोहोचण्यापूर्वी दिल्लीतील प्रजेची कत्तल करुन ,महंमद बादशहास पुनः तख्तावर बसवून नादिरशहा इराणला परत गेला होता.

आपल्या आयुष्यात एकही युध्द न हरलेला बाजीराव आपल्या राज्याच्या सीमा विस्तारता विस्तारता ,उत्तरेकडील मोहीमेवर असताना नर्मदे किनारी रावेर येथील आपल्या छावणीत आला. वरखेडाहून कूच केल्यापासून जवळ जवळ दीड महिना उन्हातान्हात दौड केल्याने स्वारी अचानकपणे आजारी पडली. अंगात ज्वर असतानाही नर्मदेत डुंबण्याची लहर आली , मल्हारराव ,राणबा ,पिलाजी नको नको म्हणून



सांगत असताही दुसऱ्या दिवशी पुनः नर्मदेत डुंबण्यसाठी उतरले. मनसोक्त पोहले ज्वर आणखी चढला. छावणीत वैद्य ,हकीम होते पण कोणाच्याही उपचारास गुण आला नाही.

**वैशाख शुध्द १३ शके १६६२**

**( २८ एप्रिल १७४० )**

**बाजीराव पेशवे कैलासवासी झाले.**

नर्मदा किनारीच चिता रचण्यात आली.
आणि अग्निसंस्कार करण्यात आले.




रावेर गाव आणि राऊंच्या / बाजीरावांच्या नर्मदे किनारी असलेल्या समाधिकडे जाणारी वाट.







बाजीराव पेशवे समाधि , रावेरखेडी ( म.प्र.)




बाजीराव पेशव्यांच्या समाधिच्या आवारात सभोवती ओवऱ्या आहेत म्हणून या भागात ही समाधि सराई म्हणून ओळखली जाते.




# बाजीराव पेशवे समाधि
# रावेर ( मध्य प्रदेश )




बाजीराव पत्नी काशीबाईंनी बांधलेले
रावेर येथील शिवमंदिर
श्री
SHIVDEKAR



त्या शूराने भगवा झेंडा हिंदुस्थानी नाचविला
निज राष्ट्राचे वैभव नेले एकसारखे बढतीला

जिकडे तिकडे समशेरीची कीर्ति आपुल्या गाजविली
खूप शर्तीने कदर आपली गनीमांस त्या लावियली

गुणी जनांची पारख करुनी त्या धीराने गौरविले
उत्साहाच्या वाते अपुल्या तेज तयांचे चेतविले

प्रतापदीपज्योति पोषिली सुजनस्नेहा वाढवुनी
गनीममशके कितीक गेली तिच्यामधे खाक् होवोनी !

निजमनाचा 'गाजी' ऐसा अर्थ उरवुनी तो गेला
हळहळली आर्यमाउली ऐकुनी त्याच्या निधनाला

– केशवसुत



मराठेशाहितील
महापराक्रमी पेशव्याची
ही थोडक्यात ओळख

श्री
SHIVDEKAR